# नोटाबंदी, राष्ट्रवाद आणि लोकशाही

*निश्चलनीकरणाचा प्रयोग जोरदार फसला; राष्ट्राला सत्ताधारी वर्गांपासून सोडवण्याची गरज आहे.*

सदर मजकूर लिहिला जात असताना नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार आणि भारतीय जनता पक्ष (भाजप) यांनी ८ नोव्हेंबर हा 'काळा पैसा विरोधी दिवस' साजरा केला. गेल्या वर्षी याच दिवशी पंतप्रधान मोदी यांनी 'भ्रष्टाचार व काळ्या पैशाचा विळखा तोडण्या'साठी चार तासांमध्ये 'पाचशे व एक हजार रुपयांच्या नोटा कायदेशीर चलनातून बाद होतील' अशी घोषणा केली होती. यामुळे देशाच्या एकूण चलनातील ८४ टक्के चलन विनिमयातून काढून घेतले जाणार होते, परंतु त्याची जागा घेणारे नवे चलन वापरात ओतण्यासाठी भारतीय रिझर्व बँक व बँकिंग व्यवस्था यांची आवश्यक तेवढी तयारी झालेली नव्हती. यातून आर्थिक जीवनाचा पूर्ण बोजवारा उडाला. लाखो लोकांची दुर्दशा, गैरसोय आणि अप्रतिष्ठा आपण करतो आहोत, याची जाणीव मोदींना अर्थातच होती; परंतु त्यांनी आश्चर्यकारकरित्या पूर्ण शांत व संयमी राहाण्याची भूमिका घेतली.

त्यांची कृती विवेकाला फाटा देणारी होती, परंतु काळ्या पैशाच्या सर्व मुरब्बी वापरकर्त्यांनी साठवून ठेवलेल्या नोटा निश्चलनीकरणामुळे 'केवळ कागदाचे मूल्यहीन तुकडे बनतील', असा विश्वास त्यांना होता. (निश्चलनीकरणासाठी वापरला जाणारा इंग्रजी शब्द 'डीमॉनेटायझेशन'/Demonetisation असा आहे. यातील पहिली पाच अक्षरंच- Demon /डेमन- मोदींच्या या प्रक्रियेचं योग्य वर्णन करणारी ठरतात). परंतु हे मुरब्बी व्यापारी कोणतेतरी 'जुगाड' करून त्यांचा बहुतांश काळा पैसा कायदेशीर बँकिंग व्यवस्थेत आणतील, हे मोदींसारख्या व्यवसाय व राजकारण यांच्यात निष्णात असलेल्या नेत्याला निश्चितपणे माहीत होतं.

मग या वर्षी ८ नोव्हेंबरला सरकार आणि भाजप काय साजरं करत होते? निश्चलनीकरणानंतर बाद झालेल्या आपल्या नोटा बदलून नवीन नोटा घेण्यासाठी लांबच लांब रांगांमध्ये उभं राहिलेल्यांपैकी शंभरहून अधिक लोकांना प्राण गमवावे लागले, ही वस्तुस्थिती सरकारला साजरी करायची होती का? तातडीची वैद्यकीय बिलं भरण्यासाठी रोख रक्कम उभी करू न शकल्यानं आपल्या जिव्हाळ्याच्या व्यक्तींना गमावून बसलेल्या लोकांचा शोक साजरा करण्यासाठी सरकारनं ८ नोव्हेंबरला कार्यक्रम केले का? अनौपचारिक मजुरांना निश्चलनीकरण झालेल्या नोटांमध्येच वेतन स्वीकारण्याची सक्ती झाली आणि मग 'जवळच्या बँकेत जाऊन नोटा बदलून घेण्यासाठी रांगेत थांबावं लागलं किंवा दलालांकरवी कमिशन देऊन नोटा बदलून घ्याव्या लागल्या', ही साजरी करण्यासाठी बाब आहे असं सरकारला वाटतं का? उत्तर भारतामध्ये 'खरीप पिकांच्या विपणनातील अडचणींनंतर रब्बी पिकाच्या पेरणीसंदर्भात नवीन अडचणी निर्माण झाल्या', हे सत्य साजरं करण्यासारखं आहे? निश्चलनीकरणाच्या क्रूर निर्णयानं सर्वसामान्य लोकांना सहन करावा लागलेला ताण आणि निराशा यांच्यातील संबंध अलीकडे झपाट्याने दुर्मीळ होत असलेल्या संवेदनशीलतेनं व सहानुभूतीनं उलगडण्याचं काम आमचे माजी सहकारी सी. राममनोहर रेड्डी यांनी 'डिमॉनेटायझेशन अँड ब्लॅक

मनी' (ओरिएन्ट ब्लॅकस्वॅन, २०१७) या त्यांच्या नव्या पुस्तकात केलं आहे.

लाखो लोकांवरील हा अत्याचार आणि त्यांची अप्रतिष्ठा करण्याचा प्रकार नक्की कशासाठी होता, असा प्रश्न आपण विचारू शकतो. निश्चलनीकरण झालेल्या चलनातील केवळ एक टक्का चलन बँकिंग व्यवस्थेत परतलेलं नाही, आणि त्यातही सर्व काळा पैसा होता असं गृहीत धरता येत नाही. अंदाजे बनावट चलनापैकी केवळ सुमारे पाच टक्के चलन निश्चलनीकरणानं दूर केलं आहे. निश्चलनीकरणाचे अधिकृत उद्देश म्हणून ज्या गोष्टी सांगण्यात आल्या होत्या, त्या संदर्भात हा निर्णय जोरदार अपयशी ठरला आहे. परंतु इतका तणाव आणि अत्याचार सहन करावा लागूनही फारशी संघटित निदर्शनं वा आंदोलनं का झाली नाहीत, हा प्रश्न उरतोच. किंबहुना निश्चलनीकरणाचा फटका बसल्यानंतरही उत्तर प्रदेशात भाजपनं प्रचंड बहुमतानं सत्ता मिळवली. निश्चलनीकरणामुळं आजूबाजूला इतकी व्यथा पसरली असूनही स्वतः शांत व संयमी भाव कायम ठेवणाऱ्या मोदी 'ब्रँड'च्या जोरावर उत्तर प्रदेशात सत्ता मिळवायला मुख्य मदत झाली. शिवाय, आताच्या हिंदुत्वभारित राष्ट्रवादाला अजूनही पाठिंबा मिळतो आहे, हेही एक कारण आहे. 'काळ्या पैशाचा विळखा तोडण्यासाठी' मोदी *'राष्ट्रद्रोही व समाजविरोधी घटकांनी साठवून ठेवलेल्या नोटांना केवळ कायदाचे मूल्यहीन तुकडे'* बनवतील, असं बहुसंख्य लोकांना वाटत होतं. (तिरपा ठसा आमचा.)

ब्रिटिश वासाहतिक सत्ताधाऱ्यांकडून सत्तेचं हस्तांतरण झाल्यावर आजचे लुटारू, गुंड भारतीय सत्ताधारी वर्ग सत्तेमध्ये आहे, परंतु प्राथमिक व्यवस्थात्मक बदल फारसा झाला नाही, हे अजूनही पुरेशा प्रमाणात मान्य झालेलं नाही. त्यामुळं आर्थिक स्वातंत्र्यासाठीचा संघर्ष करताना या सत्ताधारी वर्गाविरोधात क्रांतिकारी चळवळीची गरज आहे. या व्यवस्थेतील बलवान गटांच्या विशिष्ट हितसंबंधांसाठी दलालाची भूमिका करणाऱ्या गुंड 'राजकीय वर्गा'विरोधातही संघर्ष गरजेचा आहे. भारतीय भांडवलशाहीच्या एकाधिकारशाहीकडं कलणाऱ्या प्रवृत्तीपासून लोकांचं रक्षण करण्याचं काम उदारमतवादी राजकीय लोकशाही काही वेळा केलेलं आहे (उदारणार्थ, आणीबाणी लादणाऱ्यांना सत्तेवरून खाली आणणं), परंतु दमन होणाऱ्या, पिळवणूक होणाऱ्या आणि अंकित लोकांना त्यांचे हितसंबंध पुढं नेण्याकरिता राजकीय सत्ता मिळवण्यासाठी सक्षम करण्याचं काम या उदारमतवादी लोकशाहीनं केलेलं नाही. उलट, सत्ताधाऱ्यांनी या लोकशाहीचा वापर करून स्वतःचे हितसंबंध पुढं रेटले, त्यासाठी वरपांगी लोकांची सहमती असल्याचा देखावाही उभा केला.

भाजपचं हिंदुत्ववादी-राष्ट्रवादी असत्यकथन भारतीय सत्ताधारी वर्गाच्या व त्यांच्या राजकीय दलालांच्या 'राष्ट्रांतर्गत राष्ट्रविरोधा'ला मुभा देतं. लोकांना चिरडणाऱ्या या व्यवस्थेला उघडं पाडण्याची गरज आहे. राष्ट्रवादाच्या नावाखाली मोदी करत असलेले उपदेश- याला राष्ट्रभक्ती मानलं जातंय- आणि त्याचसोबत या राष्ट्रवादाला असलेली हिंदुत्वाची झालर यांचा अजूनही बहुसंख्यांवर अफूसारखा परिणाम होतो आहे. या बहुसंख्यांना देशभक्तीच्या भावनांवरून भडकावण्याचं काम सत्ताधारी करत आहेत. परंतु, सत्य मांडणं गरजेचं आहे : काळी अर्थव्यवस्था (आणि काळा पैसा) हा लुटारू भारतीय भांडवलशाहीचा अविभाज्य भाग आहे. यापासून सुटका करून घेण्यासाठी 'राष्ट्रांतर्गत राष्ट्रविरोधी' कृत्यं करणाऱ्या भारतीय सत्ताधारी वर्गाविरोधात आणि त्यांच्या राजकीय दलालांविरोधात वर्गसंघर्ष करणं हा एकमेव मार्ग आहे. ●

***'वाटसरू'च्या वर्गणीसंदर्भात आमच्या कार्यालयाशी पुढील क्रमांकावर संपर्क साधा. भ्र. ७७७६९०२२६७***

# मरण स्वस्त होत आहे

*'व्यवसायसुलभते'साठी कामगारांच्या सुरक्षिततेकडं बेफिकीर दुर्लक्ष केलं जातं आहे.*

भारतामध्ये मरण स्वस्त झालेलं आहे. गरीब आणि कष्टकरी लोक मरतात तेव्हा तर फार काही संतापही व्यक्त केला जात नाही, इतकी ही मरणस्वस्तता फोफावली आहे. इतर असंख्य मुद्द्यांवर जनक्षोभाला खतपाणी घालायचं काम प्रसारमाध्यमं करतात, परंतु सर्वांत धोकाग्रस्त परिस्थितीत असलेल्यांची काळजी घेण्यात आपण समाज म्हणून कमी पडतो, त्याबाबत मात्र माध्यमांना क्वचितच आवाज फुटतो. त्यामुळं सरकारी मालकीच्या एका औष्णिक ऊर्जा प्रकल्पामध्ये ३२ कामगारांचा मृत्यू झाला आणि १०० जण गंभीररित्या जखमी झाले, तरी ही घटना एखादा सर्वसाधारण अपघात असल्यासारखी दुर्लक्षिली गेली. राज्य सरकारनं या प्रकरणात नुकसानभरपाई देऊ केली, चौकशीला सुरुवात केली आणि हा विषय आपल्या जाणिवेतून हद्दपार झाला. उत्तर प्रदेशातील रायबरेलीमध्ये उंचहार इथल्या राष्ट्रीय औष्णिक ऊर्जा महामंडळाच्या (नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन : एनटीपीसी) ५०० मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पामध्ये १ नोव्हेंबर रोजी 'अपघात' झाला, यातून भारतामधील कामगारांच्या सुरक्षिततेबाबतची बेफिकीर वृत्ती आणि कामगार कायद्यांचा गंभीर भंग होत असल्याचा प्रकार उघड झाला.

एनटीपीसीच्या या प्रकल्पात नक्की काय घडले याचे तपशील चौकशीनंतर स्पष्ट होतील, अशी आशा ठेवू; परंतु तत्पूर्वी काही तथ्यं आधीच ज्ञात झालेली आहे. उंचहार औष्णिक ऊर्जा प्रकल्पात नव्यानं कार्यरत झालेल्या युनिट सहामधील उच्च दाबाचा स्टीम-बॉयलर तांत्रिक दुरुस्तीसाठी बंद ठेवला जाणं अपेक्षित होतं. परंतु, त्याचं कामकाज सुरूच ठेवण्यात आलं, किंबहुना बिघाडामुळं बॉयलरमध्ये जमा झालेली राख हातानं काढण्याचे आदेश कामगारांना देण्यात आले. बॉयलरमधील दाब वाढल्यानंतर स्फोट झाला, तेव्हा सुमारे तीनशे कामगार त्या परिसरात होते. कामगारांच्या सुरक्षिततेला प्राधान्य दिलं असतं तर ही घटना टाळता आली असती.

ही शोकांतिका एखाद्या नियमन नसलेल्या कारखान्यात किंवा नियामक कायद्यांच्या कक्षेबाहेर कार्यरत असलेल्या लहानशा केंद्रात झालेली नाही, हेही लक्षात ठेवायला हवं. भारतातील सर्वाधिक ऊर्जा निर्माण करणाऱ्या एनटीपीसीनं चालवलेला हा ऊर्जा प्रकल्प आहे. ही कंपनी ४८ औष्णिक ऊर्जा प्रकल्पांचं व्यवस्थापन करते. या घटनेचा फटका बसलेले बहुतांश कामगार हे स्थलांतरित कंत्राटी कामगार होते, त्यांना कंत्राटदारांनी प्रकल्पस्थळी आणलेलं होतं, हेही नोंदवणं गरजेचं आहे. अनेक बड्या औद्योगिक कंपन्यांकडून ही क्लृप्ती वापरली जाते. अशा कंत्राटी पद्धतीमुळं कंपन्यांना स्वतःची जबाबदारी कमी करता येते, कारण कामगार कायद्यांच्या कक्षेत येणारे कायमस्वरूपी कामगार संख्येनं कमीच ठेवले जातात, आणि बहुतांश काम-जे अनेकदा घातक असतं-कंत्राटदारांकडं सोपवलं जातं. मग कंत्राटदार बहुतेक वेळा रोजंदारीवर अनौपचारिक कामगारांना रोजगारावर घेतात. अपघात झाल्यास वा घातक पदार्थांनी इजा झाल्यास कोणत्याही आरोग्य विम्याचं संरक्षण या कामगारांना नसतं. भारतातील औपचारिक क्षेत्राचं हे गढूळ अधोविश्व अशा अपघातांवेळी उघड होतं.

चांगली देखरेख असलेल्या उद्योगांमध्येही अपघात होऊ शकतातच. परंतु, नियमित देखरेख असेल तर अशा घटनांना प्रतिबंध करता येतो आणि त्यांच्या परिणामांची तीव्रता कमी करता येते. उदाहरणार्थ, भोपाळमधील युनियन कार्बाइडच्या कारखान्यात २ डिसेंबर १९८४ रोजी झालेल्या वायू दुर्घटनेच्या

बाबतीत, खराब देखभालीमुळं अखेरीस मिथाइल आयसोसायनेटच्या टाकीचा स्फोट झाला होता. त्यानंतर भोपाळमधील काही भागांना घेरून राहिलेल्या विषारी वायूच्या परिणामांशी अजूनही काही जण झुंजत आहेत. या शोकांतिकेमुळं कामगारांच्या सुरक्षिततेसंबंधीचे कायदे कडक करण्यात आले.

आज, 'व्यवसायसुलभता' वाढवण्याचं कारण देऊन अनेक राज्यांमध्ये हे कायदे जाणीवपूर्वक मवाळ केले जात आहेत. अशा मवाळीकरणाला नरेंद्र मोदी सरकारचं प्रोत्साहन मिळतं आहे. २०१४पासून 'कंत्राटी मजुरी (नियमन व निर्मूलन) अधिनियम, १९७०', 'कारखाना अधिनियम, १९४८', आणि 'औद्योगिक वाद अधिनियम, १९४७' यांमध्ये दुरुस्त्या प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. 'भारतीय बाष्पक नियमने, १९५०'अनुसार केंद्रीय बाष्पक (बॉयलर) मंडळाद्वारे तपासणी व प्रमाणीकरण गरजेचं ठरवण्यात आलं असूनही स्व-प्रमाणीकरणाला मुभा देण्यासाठी या नियमनांमध्ये बदल करण्यात आला. 'इन्सपेक्टर राज' संपुष्टात आणण्यासाठी हा निर्णय घेतल्याचं समर्थन देण्यात आलं. परिणामस्वरूपी सुरक्षिततेसंबंधीच्या नियमनांबाबत तडजोड होत नाहीये ना, हे तपासण्याची प्रक्रिया फारशी अस्तित्वात राहिली नाही.

शिवाय, कंत्राटी मजुरीवर लक्ष ठेवणारे कायदेही मवाळ करायचे प्रस्ताव आहेत, त्यामुळं अनौपचारिक मजुरांना आणखी घातक कामं करण्यासाठी वापर सुकर होईल. उंचहारमध्ये हेच घडताना दिसलं. विद्यमान कायद्यानुसार, एनटीपीसीला सर्व- कायमस्वरूपी व कंत्राटी- कामगारांसाठी जबाबदार धरता येतं. एशियाड खटल्यामध्ये (पीपल्स युनियन फॉर डेमॉक्रटिक राइट्स विरुद्ध भारत सरकार व इतर, १९८२) सर्वोच्च न्यायालयानं कंत्राटी कामगारांचा मुख्य रोजगारदाता म्हणून सरकारला जबाबदार ठरवलं होतं. जखमी कामगारांना किंवा मृतांच्या कुटुंबीयांना नुकसानभरपाई देण्याबाबत सरकारनं कितीही औदार्य दाखवलं तरी सर्व कामगारांच्या जबाबदारीपासून एनटीपीसीला पळ काढता येणार नाही, हे अधोरेखित होण्याची गरज आहे. दुर्दैवानं, कंत्राटी मजुरी कायद्यामधील दुरुस्त्या अंमलात आल्या, तर कंत्राटी कामगारांच्या अधिकारांमध्ये आणखी अडथळा निर्माण होईल.

कामगारविषयक तपासणीवरही निर्बंध घालणारे नियम या सरकारनं लागू केले आहेत, त्यामुळं भारत स्वाक्षरीकर्ता असलेल्या आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या अनुच्छेद ८१चा भंग होतो. सोळा केंद्रीय कामगार कायद्यांचं पालन करत असल्याचं 'स्व-प्रमाणीकरण' घेण्याची परवानगी रोजगारदारदात्यांना श्रमसुविधा पोर्टलद्वारे देण्यात आली आहे. अशा प्रकारचं 'स्व-प्रमाणीकरण' बनावट ठरतं हे पर्यावरणीय कायद्यांच्या संदर्भात दिसून आलं आहे. कामगार कायद्यांबाबत किंवा औद्योगिक सुरक्षिततेबाबतही हे असंच घडणार नाही का? कामगार सुरक्षितता व अधिकार यांचा गंभीर भंग होत असतानाही 'मेक इन इंडिया'च्या नावाखाली गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्याच्या नादात सरकार घातक घटकांकडं दुर्लक्ष करतं आहे. यातील अनौपचारिक व रोजंदारीवरील कामगारांना तर काहीच संरक्षण नाही. या वास्तवाचं दुःखद भान आणून देण्याचं काम उंचहारमधील घटनेमुळं होतं. ●

## कामगार संघटनांसमोरील आव्हानं

*कामगार कायद्यांमधील दुरुस्त्यांच्या संदर्भात कामगार संघटनांनी आपल्या व्यूहरचनांचा पुन्हा परीक्षण करायला हवे.*

भारतामध्ये पहिली कामगार संघटना स्थापन झाली त्याला जवळपास शंभर वर्षं उलटली आहेत, संघटित

व्हायचा व सामूहिक वाटाघाटी करायचा आपला अधिकार मिळवण्यासाठी कष्टकरी वर्गानं कित्येक दशकं लढाही दिला आहे आणि आता राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार पुन्हा आदिम काळाकडं जाण्याचा निर्धार केल्यासारखं वागतं आहे. भारतातील तथाकथित बोजड व अतिरेकी कामगार कायद्यांमुळंच गुंतवणुकीला व आर्थिक वाढीला खीळ बसते आहे, असा समज प्रसृत करण्याचं काम मुख्यप्रवाही माध्यमांनी आणि उद्योगविश्वानं केलं; आणि त्यांची पाठराखण करणारं सरकार सातत्यानं कामगार कायद्यांमधील सुधारणांसाठी प्रयत्नशील आहे. सर्व कामगार कायद्यांना गिळंकृत करणारे चार कामगार नियम लागू करण्याचा प्रस्ताव केंद्रानं मांडला आहे. व्यवसाय'सुलभ'तेचा उद्देश पुढं करून संघटनांचा कणा मोडायचा हा प्रयत्न आहे, अशा वेळी कामगार संघटनांनी आपल्या व्यूहरचनेचा पुनर्विचार करायची वेळ आलेली आहे का? दहा केंद्रीय कामगार संघटनांनी ९ नोव्हेंबरपासून तीन दिवस दिल्लीत निदर्शनं केली, त्याला अभूतपूर्व पाठिंबाही मिळाला, परंतु सरकार व उद्योगविश्वाकडून मिळणाऱ्या प्रतिसादाच्या संदर्भात ही निदर्शनं कितपत प्रभावी ठरली? अशासारख्या आधीच्या दोन संपांनाही प्रचंड पाठिंबा मिळाला होता, परंतु मुख्यप्रवाही माध्यमांनी त्यासंबंधी अगदी ओझरतं वार्तांकन केलं, उद्योगविश्व आणि सरकारनं या संपांना 'पक्षपाती' ठरवून टाकलं व कामगार कायद्यांमधील सुधारणांचे आपले प्रयत्न सुरू ठेवली.

विशेष म्हणजे कामगार संघटनांच्या संघटित निदर्शनांमुळं राष्ट्रीय पातळीवर कामगार कायद्यातील दुरुस्त्या करणं अवघड बनल्यावर या कामासाठी राज्य सरकारांना प्रोत्साहित करायचं काम केंद्र सरकारनं सुरू केलं. गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी राज्यांमध्ये स्पर्धा निर्माण करण्याच्या या धोरणाला समर्थकांनी 'स्पर्धात्मक संघराज्यवाद' असं नाव दिलं. भारतीय जनता पक्षाची सत्ता असलेल्या राजस्थान, मध्य प्रदेश, गुजरात व महाराष्ट्र यांच्यासोबतच आंध्र प्रदेश व तेलंगण या राज्यांनी 'कारखाना अधिनियम, १९४८', 'औद्योगिक वाद अधिनियम, १९४७' आणि 'शिकाऊ उमेदवारी अधिनियम, १९६१' यांच्या तरतुदी मालकांच्या बाजूनं सौम्य करण्यासाठी पुढाकार घेतला. नियमनाखालील क्षेत्रं आणि व्यापक धोरणात्मक मुद्द्यांवर केंद्र सरकारचं नियंत्रण असलं तरी राज्यातील 'व्यवसायविषयी वातावरण' ठरवण्याचा अधिकार राज्य सरकारांना आहे. कारखाना वाद अधिनियमात सुधारणांसाठी महाराष्ट्र सरकारनं मांडलेल्या प्रस्तावानुसार तीनशेहून कमी कामगार असणाऱ्या कारखान्यांना सूट दिली जाईल (राजस्थान व हरयाणा यांनी ही सुधारणा पूर्णही केली आहे). परंतु महाराष्ट्रानं इतर दोन राज्यांच्या पुढं पाऊल टाकत असा प्रस्ताव मांडला आहे की, तीनशेहून कमी कामगार असलेले कारखाने सरकारी मंजुरीशिवाय बंद करता येतील आणि कामगारांना घरी पाठवता येईल. फक्त असं करताना साठ दिवसांची नोटीस देण्यात यावी आणि नियमित सेवेच्या प्रत्येक वर्षासाठी साठ दिवसांची नुकसान भरपाई द्यावी, एवढीच अट ठेवलेली आहे. शिवाय, महाराष्ट्र सरकारनं 'कंत्राटी कामगार (नियमन व निर्मूलन) अधिनियम, १९७०'मध्येही दुरुस्त्या केल्या असून पन्नास किंवा अधिक कामगारांना रोजगार देणाऱ्या आस्थापनांना या कायद्याच्या कक्षेत घेतले आहेत. या पार्श्वभूमीवर स्थानिक, प्रादेशिक व राज्य पातळ्यांवर तळ ढवळून काढणाऱ्या आंदोलनांवर कामगार संघटनांनी भर द्यायला हवा. वर उल्लेख केलेल्या राज्यांमध्ये निदर्शनं झालेली असली, तरी कामगारांचे सातत्यपूर्ण आंदोलन मात्र कुठंही उभं राहिलेलं नाही.

कामगार क्षेत्रात १९९०च्या दशकापासून झालेले नाट्यमय बदल पाहाता असं आंदोलन करणं सोपं नाही, हे खरं आहे. त्या दशकापासून कामगार वर्गाचा एक मोठा घटक अनौपचारिक क्षेत्रात ढकलला गेला, पण औपचारिक क्षेत्रात रोजगारही कंत्राटी स्वरूपाचेच

झाले आहेत. कायमस्वरूपी कामासाठी कंत्राटी कर्मचारी घेण्याच्या बाबतीत सरकारी व निमसरकारी संस्था आघाडीवर आहेत, हाही यातील उपरोधाचा भाग आहे. या कामगारांना संघटित करणं हे भगीरथ कार्य आहे. कठोर कामगार कायद्यांच्या संरक्षणाखाली भारतीय कामगारांचं कथितरित्या लांगूलचालन केलं जातं, या संभाषिताचा पगडा लोकांवर आहे. त्याचा सामनाही कामगार संघटनांना करावा लागेल. या कामगार कायद्यांमुळंच उत्पादन उद्योगाची वाढ खुंटली आहे, असं उद्योगविश्वाकडून गेली कित्येक वर्षं पसरवलं जातं आहे– अलीकडं या प्रसाराचा सूर अधिक कर्कश्श बनला आहे. पण या कामगार कायद्यांची अंमलबजावणी दुबळ्या व अपरिणामकारक पद्धतीनं होते आणि त्यातील मूलतत्त्वांचा भंग केला जातो, हे मात्र या गोंगाटात सांगितलं जात नाही. मुळात वाढत्या कंत्राटीकरणामुळं मोठ्या प्रमाणात कामगार या कायद्यांच्या कक्षेत येतच नाहीत.

संयुक्त कामगार संघटनांचा मंच (आणि त्रिपक्षीय वाटाघाटी) गंभीरपणे घेऊन अर्थपूर्ण चर्चा करण्यासाठी सरकारवर दबाव आणण्याचं आव्हान संघटित कामगार चळवळीसमोर आहे. सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या व बँकांच्या कामगार संघटनांची भूमिका या संदर्भात उदाहरणादाखल पाहाता येईल. खराब कार्यसंस्कृतीच्या मुद्द्यावरून या कंपन्या व बँकांवर सरकार आणि माध्यमांकडून टीकेची झोड उठवली जाते. या कंपन्यांबाबत निर्गुंतवणुकीचं धोरण राबवण्याची गरजही अधोरेखित केली जाते आहे. परंतु, या कंपन्यांच्या पुनरुज्जीवनाच्या योजना तयार करताना त्यात कामगार संघटनांना क्वचितच सहभागी केलेलं असतं. उलट, संघटनांकडं शत्रुभावी पद्धतीनं पाहिलं जातं. उदाहरणार्थ, अलीकडंच सार्वजनिक क्षेत्रातील दहा बँकांमध्ये भांडवली गुंतवणूक करताना कर्मचाऱ्यांच्या लाभामध्ये कपात करण्याची अट घालण्यात आली होती. या विरोधात बँकांच्या कामगार संघटनांनी निदर्शनं केली; शिवाय खाजगी उद्योजकांमधील कर्जबुडव्यांविरोधात कारवाईचा मुद्दाही या निदर्शनांमध्ये उपस्थित करण्यात आला. परंतु या संघटनांची भूमिका अहंकारी व अवास्तविक आहे, अशी टीका माध्यमांनी केली. किमान वेतनाची खराब अंमलबजावणी आणि प्रत्येक उद्योगात वाढत असलेलं कंत्राटीकरण या दोन महत्त्वाच्या मुद्द्यांना हाताळण्याचं कामही कामगार संघटनांना करावं लागेल. कंत्राटीकरणाच्या या प्रक्रियेमुळं कामगार संघटनांची वाटाघाटी करण्याची ताकदही कमी केली आहे.

कारखाने बंद पाडणं आणि कामगारांना घरी पाठवणं, यांसोबतच कामगार कायद्यांमधील सुधारणा लोकशाही अधिकारांवर आक्रमण करणाऱ्याही आहेत, हे दाखवून देण्याची गरज आहे. त्यातून कामगार वर्गाचे प्रश्न व्यापक जनतेपर्यंत नेणं हे गुंतागुंतीचं आणि प्रचंड मोठं काम कामगार संघटनांना करावं लागणार आहे. पुरोगामी राजकीय व सामाजिक चळवळींशी संवाद साधणं हा यासाठीचा एक मार्ग असेल. ●

---

## सर्वोच्चपण धोक्यात

*घटनात्मक लोकशाहीच्या भवितव्याच्या दृष्टीनं दुर्बल न्यायव्यवस्था अनिष्टसूचक आहे.*

'शस्त्रसत्ता अथवा धनसत्ता' यांच्यावर न्यायव्यवस्थेचं नियंत्रण नसतं. नागरी, फौजदारी वा घटनात्मक वादांमध्ये आपण तटस्थ, स्वतंत्र व निःपक्षपाती मध्यस्थ आहोत, या आकलनावरच न्यायव्यवस्था पूर्णतः विसंबून असते. न्यायव्यवस्था आपल्या कामकाजासंबंधी लोकांचा विश्वास दैनंदिन पातळीवर दृढ करत असते म्हणूनच लोकांचा तिच्यावर विश्वास टिकून राहातो. केवळ अवमानविरोधी कारवाईचा वापर आणि कार्यालयीन

बडेजाव यावर न्यायालयाची प्रतिष्ठा उभारलेली नाही. न्यायाधीश आणि वकील कशा प्रकारे कामकाज चालवतात आणि बाह्य आव्हानांना सामोरं जाताना संस्थेला कशा रितीनं संरक्षित ठेवतात, यांवर न्यायव्यवस्थेची प्रतिष्ठा ठरत असते. न्यायव्यवस्थेच्या या वैशिष्ट्यामुळंच लोकसेवक व निवडून आलेले प्रतिनिधी यांच्यापेक्षा न्यायाधीशांकडून उच्च दर्जाच्या वर्तनाची अपेक्षा ठेवली जाते. त्यांना हा दर्जा पाळता आला नाही तर संपूर्ण न्यायव्यवस्थेवर त्याचा विपरित परिणाम होतो.

भारताचे सरन्यायाधीश, इतर काही न्यायाधीश आणि वकिलांमधील काही जणांनी अलीकडंच केलेल्या कृतींनी मात्र भारतीय सर्वोच्च न्यायालयाची सचोटी रसातळाला गेल्याचं दिसतं आहे. एकाच आठवड्यात घडलेल्या पुढील घटना याची साक्ष देतात : सुरुवातीला उच्चपदस्थ न्यायिक भ्रष्टाचाराविषयीची चिंता व्यक्त झाली, न्यायाधिशांनी न्यायिक शिस्तीचा भंग केला, कुणीही स्वतःशी संबंधित खटल्यात न्यायाधीश असू नये या तत्त्वाचा उपहास सरन्यायाधिशांनी केला, न्यायालयात न्यायाधिशांना उत्तरदायी ठरवू पाहाणाऱ्यांना वकिलांनी धमकावलं, आणि अखेरीस या सर्व विषयाला पूर्णविराम देण्याच्या नावाखाली तपासप्रक्रियेत हस्तक्षेप करणारा बदनामीकारक आदेश देण्यात आला. सर्वोच्च न्यायालयानं एक संस्था म्हणून स्वतःची विश्वासार्हता गमावली आहे, हे यातून निःसंदिग्धपणे समोर आलं.

न्यायालयानं १४ नोव्हेंबर रोजी दिलेला आदेश काहीही सुचवत असला, तरी 'मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया'शी (एमसीआय) संबंधित भ्रष्टाचाराच्या खटल्यातून सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधिशांच्या सचोटीबाबत गंभीर शंका उपस्थित होतात. विद्यमान सरन्यायाधीश दीपक मिश्रा यांच्यासमोर गतकाळात सुनावणी झालेल्या आणि निकाल देण्यात आलेल्या खटल्यांनाही या शंका लागू होतात. या संदर्भात केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय : सेंट्रल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन) चौकशी करतो आहे. अशा प्रकारच्या पक्षपाती व गचाळ तपासप्रक्रियांनी कारकीर्द घडवलेल्या व्यक्तीला या प्रकरणी कसून काम करता येईल का, हे जाणून घेणं लोकहितासाठी आवश्यक आहे. या तपासाचा वापर करून न्यायाधिशांवर दबाव आणण्याचा किंवा त्यांची बदनामी करण्याचा प्रयत्न होऊ शकतो, त्यामुळं या प्रक्रियेवर न्यायालयीन आदेशानं देखरेख ठेवावी, असं या प्रकरणी सुरुवातीची याचिका दाखल करणाऱ्या 'कॅम्पेन फॉर ज्युडिशियल अकाउन्टेबिलिटी अँड ज्युडिशियल रिफॉर्म्स' (सीजेएआर) या संस्थेनं म्हटलं होतं.

यानंतर काही मोठी, काही छोटी अशी चुकीची पावलं उचलण्यात आली. त्यामुळं न्यायव्यवस्थेला कायमस्वरूपी हानी पोचवणाऱ्या विदृपतेचं जाहीर प्रदर्शन झालं. ही हानी भरून येणारी नाही. वकील कामिनी जयस्वाल यांनी दाखल केलेल्या दुसऱ्या याचिकेबाबत प्रश्न उपस्थित झाले आणि ही याचिका सुनावणीसाठी घटनात्मक खंडपिठाकडं पाठवण्याचा न्यायमूर्ती जे. चेलमेश्वर यांचा निर्णयही वादग्रस्त ठरला. पण सरन्यायाधिशांच्या विवाद्य कृतींनी या सगळ्यावर कडी केली. कोणी कोणतं काम करावं हे ठरवण्याचा अधिकार आपल्याकडं असल्याचं जोरदार प्रतिपादन त्यांनी केलं. औचित्याच्या सर्व संकल्पना आणि नैसर्गिक न्यायाची मुख्य तत्त्वं यांच्या विरोधात जाणारी त्यांची ही कृती होती. त्यांनी काळजीपूर्वक निवडलेल्या न्यायाधिशांच्या खंडपिठानं १४ नोव्हेंबर रोजी या संदर्भात आदेश काढला. सरन्यायाधिशांच्या कृती प्रश्नांकित करता येणार नाहीत, असा निर्वाळा या खंडपिठानं दिला. परंतु या प्रतिपादनाला कायद्यात फारसा काही आधार नाही आणि काही तारतम्यही त्यामागं असल्याचं दिसत नाही. सरन्यायाधिशांच्या अशा कृतींमुळं त्यांच्याबाबतच्या शंका मिटण्याऐवजी अधिक गंभीर व अस्वस्थकारक प्रश्न उपस्थित होतात.

खंडपीठ आणि वकीलवर्ग यांच्यातील फाटाफूट,

न्यायाधिशांमधील आणि वकिलांमधील अंतर्गत फूट या सगळ्या गोष्टी या घटनाक्रमातून अधोरेखित होतात. ही फूट अचानक पडलेली नाही, तर गेला काही काळ हे अंतर वाढत आलं आहे. उच्चपदस्थ न्यायव्यवस्थेनं स्वतःचे अधिकार आणि न्यायक्षेत्र विस्तारलं, परंतु स्वतःची अधिक छाननी व्हावी आणि उत्तरदायित्वाचीही कक्षा वाढावी यासाठीचा खुलेपणा मात्र दाखवायला मात्र नकार दिला. यामुळं निर्माण झालेले तणाव कधी ना कधी उघड्यावर येणारच होते. आता ते अतिशय विदृप पद्धतीनं घडलं आहे. सर्व संबंधांमध्ये आता खोलवर अविश्वास निर्माण झाला असून न्यायव्यवस्थेला त्याचा भार सहन करावा लागणार आहे.

सरन्यायाधिशांना 'क्लिन चिट' देण्याच्या बनावट प्रयत्नांमधून केवळ त्रुटींवर घाईघाईनं पांघरूण घालण्याची वृत्ती दिसते. म्हणजे खऱ्या अर्थानं अंतर्मुख होऊन विचार केला जाण्याची शक्यताही नाही. न्यायव्यवस्थेतील भ्रष्टाचाराविषयीची कुजबुज वाढू लागली असून त्याला उघडपणे सामोरं जाण्यात ही व्यवस्था अनुत्सुक आहे, त्यामुळं परिस्थिती आणखीच बिघडणार आहे. गेल्या एका दशकामध्येच दोन उच्च न्यायालयीन न्यायाधिशांना महाअभियोगाला सामोरं जावं लागलं आणि या शंकेच्या भोवऱ्यातच त्यांनी राजीनामा दिला, दुसऱ्या एका न्यायाधिशाविरोधात भ्रष्टाचाराच्या आरोपांसंबंधीचा खटला अजूनही सुरू आहे. अलीकडंच अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली करण्यात आलेले दिल्ली उच्च न्यायालयाचे एक न्यायाधीशही शंकेच्या भोवऱ्यात आहेत. ज्ञात उत्पन्नस्रोतांपेक्षा अवाजवी जास्त संपत्ती राखल्याबद्दल या न्यायाधिशांच्या मुलाला कनिष्ठ न्यायव्यवस्थेतील पदावरून हटवण्याचा निर्णय दिल्ली उच्च न्यायालयानं दिला होता. 'मोजके आंबे कुजके' निघाल्याची ही प्रकरणं नाहीत, तर संस्थात्मक पराभवाचे हे दाखले आहेत. आपल्या आतमध्ये काय कुजतंय हे समजून घेण्याची क्षमता किंवा इच्छा न्यायव्यवस्थेकडं नाही. बाहेरून उत्तरदायित्वाची तजवीज करण्याचे सर्व प्रयत्नही या व्यवस्थेनं हाणून पाडले आहेत.

ही प्रकरणं भारताच्या घटनात्मक लोकशाहीसाठी अनिष्टसूचक आहेत. सरकारच्या इतर अंगाचा आदर गमावलेली आणि लोकांचा अविश्वास घालवून बसलेली न्यायव्यवस्था घटनात्मक मूल्यं व तत्त्वं यांचं संरक्षण करेल अशी आशा करणं अवघड आहे. संघराज्यप्रणालीत वादांमध्ये प्रामाणिक तोडगा काढणारी संस्था, निवडणुकीय वादांमधील निःपक्षपाती मध्यस्थ किंवा घटनेतील नागरी अधिकारांची संरक्षक ही न्यायव्यवस्थेची भूमिका भारतीय राज्यघटनेच्या कामकाजासाठी मूलभूत आहे. भ्रष्टाचार, कारस्थानं आणि आप्तानुग्रह (निपोटिझम) यांनी ग्रासलेली न्यायव्यवस्था यातली कोणतीही भूमिका परिणामकारकरित्या पार पाडेल, अशी आशा ठेवता येत नाही. भारतीय जनतेला अर्थातच याहून चांगली व्यवस्था आवश्यक आहे.●

## विचारांवरील धुरकं

*प्रदूषण फक्त हवेत नाहीये, तर धोरणं तयार करणाऱ्यांच्या डोक्यातही ते पसरलेलं आहे.*

नवी दिल्लीतील धुरकं (स्मॉग) आणि त्याभोवतीचा गदारोळ ही दर वर्षीची गोष्ट आहे. परिस्थिती आणीबाणीची आहे, असं आपल्याला सांगण्यात आलंय. या समस्येसंदर्भात दिल्ली सरकार हरयाणा व पंजाब यांच्यावर ठपका ठेवतं, तर ही दोन राज्यं दिल्लीला दोष देतात आणि सगळे मिळून केंद्र सरकारला दोष देतात. भारताच्या सर्वांत लाडावलेल्या या शहरातील दुर्बल रहिवासी मात्र शुद्ध हवेचं केवळ

स्वप्नच बघत राहातात. गरीबांसाठी, बालकांसाठी आणि वृद्धांसाठी जगण्यासाठी श्वासोच्छवास करणं किंवा श्वास घेऊन मरणं या दोनमध्ये निवड करायची वेळ येते. हे विधान नाट्यमय वाटत असलं तरी अनेक प्रतिष्ठित संस्थांच्या असंख्य अभ्यासांनी या कुरूप वास्तवाला आधार मिळालेला आहे. हवा प्रदूषणामुळं २०१५ साली भारतात २५ लाख अकाली मृत्यू झाल्याचं अलीकडंच 'लॅन्सेट' या ब्रिटिश पत्रातील लेखात नोंदवण्यात आलं होतं.

या वर्षी ७ नोव्हेंबरला दिल्लीवर धुरक्याचं सावट पसरलं असलं तरी त्याची तयारी अनेक वर्षांपासून नसली तरी अनेक महिन्यांपासून होत असते. अनिल अगरवाल आणि 'सेंटर फॉर सायन्स अँड एनव्हायर्नमेंट' (सीएसई) यांनी २००२ साली दिल्लीतील हवेच्या गुणवत्तेबद्दल धोक्याची घंटा वाजवली; शिवाय, सर्व सार्वजनिक वाहतुकीच्या वाहनांसाठी डिझेलऐवजी संकोचित नैसर्गिक वायू (सीएनजी : कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस) वापरावा यासाठी त्यांनी लढाही दिला, तेव्हापासून हे संकट अधिकाधिक प्रकट स्वरूपात दिसू लागलं आहे. पण यावर फार काही उपाययोजना करण्यात आली नाही, त्यामुळं आजघडीला दिल्ली अरिष्टचक्रात अडकली आहे. मेट्रो रेल्वे बांधूनही शहरातील रुंद रस्ते वाहनांच्या कोंडीनं गच्च होत आहेत. डिझेल जाळत ट्रक शहरात वावरतच आहेत; घन कचरा खुल्यावर जाळण्यात येतो आहे; औद्योगिक पट्ट्यांवर प्रदूषणाबाबत काही देखरेख राहिलेली नाही; शहराच्या पंचक्रोशीतील औष्णिक ऊर्जा प्रकल्प सल्फर डायऑक्साइड आणि राख हवेत सोडत आहेत; शिवाय शेकडो डिझेल जनित्रं या हवाई कोंडीत भर टाकत आहेत. या सगळ्यातून शहराला विषारी हवेचा विळखा वर्षभर बसलेला असतो. हिवाळ्यात धुरक्यामुळं तो दृश्यमान होतो, एवढंच.

गेल्या वर्षी 'इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, कानपूर'नं दिल्लीतील हवा प्रदूषणाच्या समस्येविषयीचा एक अहवाल प्रसिद्ध केला. उन्हाळ्यात शेजारच्या राज्यांमध्ये पिकांचे अवशेष जाळण्याचं काम सुरू नसतं तेव्हाही दिल्लीतील हवेची गुणवत्ता अतिशय खराब असते, असं या अहवालात नोंदवलेलं होतं. यातून निर्माण झालेल्या कणीय पदार्थामुळं हिवाळ्यात परिस्थिती आणखी गंभीर बनते, हे खरं आहे, परंतु हवेच्या खराब दर्जाचं हे मुख्य किंवा एकमेव कारण नाही. दिल्लीच्या हवेत आढळणारं ९८ टक्के सल्फर डायऑक्साइड आणि ६० टक्के नायट्रोजन डायऑक्साइड औष्णिक ऊर्जा प्रकल्प, औद्योगिक क्षेत्रं, रेस्टॉरंट व डिझेल जनित्रं यातून आलेले असतात, असं या अभ्यासातून सिद्ध होतं. दिल्लीपासून ३०० किलोमीटरांच्या अंतरामध्ये १३ औष्णिक ऊर्जा प्रकल्प आहेत, २० बडे उद्योग आहेत आणि २५ औद्योगिक क्षेत्रं आहेत. यातील अनेक उद्योग इंधन म्हणून भट्टी तेलाचा वापर करतात. प्रति दशलक्ष सल्फरमागे निर्धारित केलेली ५०० कणांची मर्यादा या वापरात ओलांडली जाते. त्याचप्रमाणे औष्णिक ऊर्जा प्रकल्पांमधून सोडले जाणारे वायू आणि राख यांच्यावरही काहीच देखरेख राहिलेली नाही. अन्न शिजवण्यासाठी कोळशाचा वापर करणारी नऊ हजार लहान हॉटेलं व रेस्टॉरन्ट दिल्लीत आहेत. शिवाय, दिल्लीतील ९० टक्के रहिवासी आता स्वच्छ इंधन वापरत असले, तरी उर्वरित १० टक्के लोक अन्न शिजवण्यासाठी लाकडाचा, पीक अवशेषांचा, गायीच्या शेणाचा, किंवा कोळशाचा वापर करतात. यात भर घालण्याचं काम रस्त्यावरील वाहनं करतात. दिल्लीतील वाढत्या वाहनांमुळं प्राणघातक कणीय पदार्थात (पर्टिक्युलेट मॅटर: पीएम२३) २० टक्क्यांची भर पडत असते.

सध्याच्या चर्चेचा केंद्रबिंदू दिल्ली असला तरी वर उल्लेखित घटकांचा संयोग होऊन भारतातील अनेक शहरं खराब हवेच्या विळख्यात अडकलेली आहेत, हे वास्तव आहे. उत्तर भारताला, किंबहुना भारतीय उपखंडाच्या उत्तर भागाला या संकटाचा सर्वाधिक

धोका आहे. दिल्लीतील हवेविषयी भारतीय माध्यमं चर्चा करत असताना पाकिस्तानातील लाहोरमध्ये हवेची स्थिती याहून खराब होती. सीमेच्या दोन्ही बाजूच्या लोकांवर अनिष्ट परिणाम करणाऱ्या या समस्येवर उपाय करण्यासाठी आपण शेजाऱ्यांसोबत संवाद साधायला हवा आणि सहकार्य करायला हवं, हे यातून दिसून येतं. भारत व पाकिस्तान यांचा इतिहास समान आहे, त्याचप्रमाणे भूगोलही समान आहे. उत्तर भारतात अनुभवास येत असलेलं पर्यावरणीय संकट पाकिस्तानी शहरांमध्येही घोंघावत आहे.

ही समस्या केवळ मोसमी स्वरूपाची नसून बारमाही आहे, आणि ती केवळ एका शहरापुरती मर्यादित नाही तर एका भौगोलिक प्रदेशाला (यात पाकिस्तानही आला) व्यापणारी आहे, हे आपण लक्षात घ्यायला हवं. यावर तत्काळ इलाज करणारे उपाय नाहीत, हे आपल्या धोरणकर्त्यांनी ध्यानात घ्यायला हवं. अर्थात, तातडीचे उपाय अपरिणामकारक वाटले तरी ते करणंही तितकंच गरजेचं आहे. काहीच न करण्यापेक्षा काहीतरी केलेलं बरं. पण हवा थोडीशी साफ झाली की पुन्हा 'ये रे माझ्या मागल्या' अशी स्थिती होऊ नये. अशाच मनोवृत्तीमुळं आपली आज ही गत झाली आहे. धुरकं नसेल तेव्हाही आपल्या शहरांमधील हवा प्राणघातक असतेच.

जगभरात अशा प्रकारच्या संकटांवर तोडगा काढलेल्या शहरांचे पुरेसे दाखले आहेत. पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत राहाण्यासाठी या शहरांनी स्वतःमध्ये आवश्यक ते बदल केलेले दिसतात. जमीनवापरासाठीच्या कायद्यांसोबत इतरही व्यवहारांवरील विविध नियमनं; खाजगी वाहतुकीपेक्षा सार्वजनिक वाहतुकीला प्राधान्य; मोकळ्या व वृक्षाच्छादित जागा लोकांसाठी खुल्या करणं- अशी काही पावलं यासाठी उचलावी लागतात. शिवाय, शहर हे काही बेट नसतं, त्यामुळं आसपासच्या प्रदेशांमधील प्रदूषणाच्या स्रोतांवर चाप बसवणंही तितकंच गरजेचं असतं. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे शहर प्रदूषणमुक्त करण्यासाठी आपलाही सहभाग आवश्यक आहे हे नागरिकांना समजावून देणं आवश्यक आहे. हवा स्वच्छ करणारी कोणतीही जादुची छडी अस्तित्वात नाही. आपली शहरं राहाण्याजोगी बनवण्यासाठी पद्धतशीर आणि दीर्घकालीन नियोजन करणारा शाश्वत कृतिआराखडा तयार करणं, हा यातून बाहेर पडायचा एकमेव मार्ग आहे. ●

**अनु. : प्रतिनिधी**

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे विविध संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाउंडेशन'चे साहाय्य लाभले आहे.

(११ व १८ नोव्हेंबर या अंकांतून)

---

**वाटसरूची विजेरी**

## प्रश्नच प्रश्न

*दिवंगत न्या. ब्रिजमोहन लोया यांच्या संशयास्पद मृत्यूची चौकशी नव्याने होणे आवश्यक आहे.*

साप्ताहिक 'कॅराव्हान'ने दि. २१ नोव्हेंबर २०१७च्या अंकात सीबीआय न्यायालयाचे न्यायाधीश ब्रिजमोहन लोया यांच्या डिसेंबर २०१४मध्ये झालेल्या आकस्मिक मृत्यूबद्दल काही वृत्तांकने प्रसिद्ध केली आहेत. ज्येष्ठ पत्रकार निरंजन टकले यांनी न्या. लोया यांच्या कुटुंबियांशी - लोयांचे वडील, बहिणी व अन्य - केलेल्या प्रदीर्घ चर्चांच्या आधारे ही वृत्तांकने तयार केलेली आहेत. या नातेवाईकांशिवाय लोयांच्या मृत्यूनंतर भूमिका बजावणारे नागपूरमधील काही प्रशासकीय अधिकाऱ्यांशीही निरंजन टकले बोललेले आहेत.